**नि. फौ. खटला क्र.११६/२०२२**

**निशाणी क्र.७३**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०१ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करते की,**

**माझे नांव** : राजाबाई गोविंद कांबळे,

**वय** : ५५ वर्षे, **धंदा** : मजुरी,

**राहणार** : येणकी, ता. उदगीर, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी साहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

मी आरोपींना ओळखते. त्यापैकी दयानंद, विजयकुमार, रणधीर, कमलाबाई व सुवर्णा हे आजरोजी न्यायालयामध्ये हजर आहेत व आरोपी गौतम, पुजा, दिक्षा आणि संगिता हे गैरहजर आहेत. (गैरहजर आरोपीच्या गैरहजेरी माफीचा अर्ज निशाणी ७३ दाखल आहे.)

०२. तीन वर्षापूर्वी दि.२९ मे रोजी रात्री १२.३० वाजता माझ्या घरासमोर येणकी येथे घटना घडली. सर्व आरोपी त्यावेळी माझ्या घरासमोर आले होते. त्यानंतर ते माझ्या घरात शिरले आणि आम्हाला मारहाण केली. त्यांनी माझ्या गळ्यातील मंगळसूत्र तोडले होते. गौतम आणि दयानंद यांनी मला डाव्या पायावर आणि माझ्या मुलाला हाताने आणि काठीने मारले होते. मी नमूद काठी बघितल्यास ओळखू शकते. आता मला मुद्देमाल क्र.२६/२०२५ मधील दोन काठ्या दाखविल्या. ह्या त्याच आहेत. त्यामधील जाड काठीला **वस्तूचिन्ह अ** आणि बारीक काठीला **वस्तूचिन्ह ब** देण्यात येते. आरोपींनी शेत नावे करतो आणि तुला, तुझ्या मुलाला मारून टाकतो अशी धमकी दिली होती. दयानंद आणि गौतम यांनी भांडणामध्ये माझे झंपर फाडले.

०३. मी त्यानंतर पोलीस ठाण्यामध्ये घटनेबाबत अर्ज वजा खबर दिली. आता मला खबर वाचून दाखविली. त्यावर माझ्या अंगठ्याचे निशाण आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ७४** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**:: आरोपी क्र.१, ३, ४ ते ६ व अधिवक्ता श्री. के.व्ही. स्वामी हे हजर आहेत. त्यांनी सरतपास सुरू करण्यापूर्वी उलटतपास घेतो असे सांगितले. परंतु सरतपास पूर्ण झाल्यानंतर अर्ध्या तासाची विश्रांती घेतल्यानंतर सुध्दा अर्ज निशाणी ७५ सादर केला आणि वेळ मागितला. परंतु प्रकरणामध्ये आरोपींनी नियमित तहकुबीचे अर्ज देऊन प्रकरण तहकूब केलेले आहे. त्यामुळे प्रकरण पुन्हा तहकूब करणे अनुचित ठरेल. सबब सदर अर्ज नामंजूर केलेला आहे आणि आरोपींच्या कसुरामुळे उलटतपास नाही. ::**

श्रवणोत्तर स्वीकृत

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.
दि.०३/११/२०२५.

सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.